**International Journal of Advance and Applied Research**

www.ijaar.co.in

**ISSN – 2347-7075** **Impact Factor – 8.141**

**Peer Reviewed** **Bi-Monthly**

**Vol. 6 No. 18** **March - April - 2025**

# मराठी संतांच्या विचारांची उपयुक्तता

**प्रा. प्रवीण भगवानराव पाऊलबुद्धे**

*रा. थार (बु). पो. हिवरा संगम*

*ता. महागाव जी. यवतमाळ. पिन - ४४५२०६.*

*Corresponding Author – प्रा. प्रवीण भगवानराव पाऊलबुद्धे*

**DOI - 10.5281/zenodo.15250610**

**भूमिका:**

संतांचे विचार हे समाजाच्या जडणघडणीमध्ये मुलाचे भूमिका पार पाडतात .आजही महाराष्ट्रातील या संतांच्या विचारांची प्रेरणा घेऊन लोक जीवन जगतात. संतांच्या सर्वधर्मसमभावाच्या विचारांवरच आजही इतके वर्ष उलटूनही पंढरीची वारी निरंतर चालू आहे ती केवळ आणि केवळ संत विचाराच्या बैठकीमुळेच. संतांनी आपल्या जीवन अनुभवातून समाजाला मौलिक विचार तत्त्वज्ञान आणि मार्गदर्शन केले. समाजाला सामाजिक मूल्य,नैतिक मूल्य,सांस्कृतिक मूल्यांचा ठेवा दिला.

संत वाङ्मयाची उपयुक्तता अनेक अंगांनी स्पष्ट करता येते. ते केवळ अध्यात्मिक उन्नतीसाठी नव्हे, तर समाज सुधारणा, नैतिकता, मानसिक शांती, आणि भाषिक विकास यासाठीही महत्त्वाचे ठरते. पुढे संत वाङ्मयाची उपयुक्तता विविध दृष्टिकोनांच्या माध्यमातून स्पष्ट केली आहे.

**अध्यात्मिक मार्गदर्शन:**

संतांनी सर्वसामान्य लोकांना ईश्वराप्राप्तीचा ईश्वर कृपेचा साधा, सरळ आणि सोपा मार्ग सांगितलेला आहे. ईश्वर प्राप्त करण्यासाठी केवळ कठोर भक्ती करणे हा एकमेव मार्ग नसून आपल्या मनामध्ये ईश्वरा प्रति प्रेम,श्रद्धा आणि भाव ह्या गोष्टी सुद्धा तितक्याच महत्त्वाच्या आहे हे संतांनी पटवून सांगितले आहे.

- भगवद्गीता ही प्राचीन संस्कृत भाषेमध्ये अस्तित्वात होती त्या कालखंडामध्ये केवळ ब्राह्मण वर्गाला संस्कृत पठण करण्याचा किंवा शिक्षणाचा अधिकार होता. समाजातील खालच्या वर्गातील लोकांना धार्मिक ग्रंथ वाचण्याची परवानगी नव्हती वास्तव म्हणलं तरी ती समजायची नाही अशा परिस्थितीमध्ये ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेचे अत्यंत साध्या सरळ आणि सोप्या भाषेमध्ये रूपांतर केले व समाजातील सर्व सरातील लोकांना त्यातील ज्ञानग्रहण करण्याची संधी उपलब्ध करून दिली.
- संत तुकाराम महाराज यांनी तत्कालीन समाजामध्ये देवा संबंधित ज्या भोळ्या व चुकीच्या समजती होत्या त्या समजूती योग्य प्रकारे लोकांना मार्गदर्शन करून दूर केल्या.'जे का रंजले गांजले! त्यासी म्हणे जो आपुले तोचि साधू ओळखावा! देव तेथेची जाणावा!' या अभंगाच्या माध्यमातून तुकाराम महाराजांनी ईश्वर भक्तीचा साधा,सरळ आणि सोपा मार्ग समाजाला सुचवलेला आहे. जो साधू रंजल्या गांजलेल्यांना दीनदु: खीतांना जवळ करतो तोच खरा साधू मानावा असे तुकाराम महाराजांनी सांगितले आहे. तुकाराम महाराजांच्या अभंगांमधून "नामस्मरण" आणि "भगवंताच्या चरणी संपूर्ण समर्पण" याचे महत्त्व पटवून सांगण्यात आले आहे.

- संत एकनाथांनी भागवतांच्या माध्यमातून भक्ति म्हणजे काय हे स्पष्टपणे सांगितले आपण जे कोणती काम करतो ते काम प्रामाणिकपणे करणे म्हणजेच ‘ भक्ती’ अशी भक्तीची साधी आणि सोपी भाषा एकनाथांनी सांगितली. वैराग्य पाळावयाचे असल्यास केवळ संसाराचा त्याग केला म्हणजेच वैराग्य असे नव्हे. संसाररूपी मनुष्याने सुद्धा ‘मी तू’ पणाचा त्याग केल्यास वैराग्य पाळता येते. नाथांनी आपल्या दत्ताच्या आरती मध्ये याचा स्पष्टपणे उल्लेख केला आहे.“मी तू पणाची केली बोळवण एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान।”.
- ‘मी तू’पणाचा भाव न बाळगता सर्व प्राणीमात्रांवर प्रेम करणे,त्यांना जीव लावणे म्हणजेच खरे भजन होय. असे नामदेव महाराजांनी सांगितले आहे विश्वामध्ये सर्वत्र ईश्वराचा प्रत्यय येणे आणि आपल्या हृदयामध्ये ईश्वरचिंतन नेहमी जागृत ठेवणे.

याच संतांनी केलेल्या मार्गदर्शनानुसार व व विचारांवर आधारित जीवन महाराष्ट्रातील बहुसंख्य लोक जगत असताना दिसतात.

**समाजसुधारणेतील भूमिका**:

संतांनी तत्कालीन कालखंडातील सामाजिक अन्याय, अंधश्रद्धा, जातिभेद, स्त्रीदास्यत्व आणि अस्पृश्यता आशा चालीरीतींना आपल्या साहित्याच्या माध्यमातून प्रखर विरोध केला.

- तत्कालीन समाजात जातीयव्यवस्था अस्तित्वात होती. चातुरवर्ण वर्ण व्यवस्थेमध्ये सर्वात खालच्या थरामध्ये असलेले अस्पृश्यांना समाजामध्ये अत्यंत ही मागणी दिली जायची महिलांना पुरुषांच्या बरोबरीने अधिकार दिले जायचे नाही. संत चोखामेळा आणि संत नामदेव यांनी जातिभेदाविरुद्ध लढा दिला आणि "माणूस धर्माने मोठा नसून त्याच्या कर्माने मोठा होतो" हा संदेश दिला.
- संत तुकाराम महाराज ही समाजातील लोकांना असलेल्या व्यसनांवर परखड शब्दांमध्ये टीका करीत असत. व्यसनाधीनतेमुळे माणसाची सामाजिक आर्थिक शारीरिक हानी होत असते. व्यसनाधीनतेमुळे घर ही बोलली जातात. ओढणी तंबाखू काढिला जे धूर ! बुडेल ते घर तेणे पापे!.
- तुकाराम माने समाजातील अंधश्रद्धा भविष्य पंचांग, शकुन अपशकुन, मुहूर्त, रूढी परंपरा यावर परखडपणे मत व्यक्त केल आहे. त्यांनी बुद्धीप्रमाणेवादाचा आग्रह धरला आहे.
- संत तुकारामांनी समाजातील अंधश्रद्धा, देवाला खुश करण्यासाठी मुक्या जीवांचा बळी देणे,कर्मकांड करणे या गोष्टींचा विरोध केला आहे. समाजातील ढोंगी साधू संतांचा तुकारामांनी विरोध केला आहे. भाकड कथा सांगून श्रमजीवर्गाच्या जीवावर बसून खाणाऱ्या या साधूंचा त्यांनी खरपूस समाचार आपल्या अभंगामधून घेतला आहे.
- संत एकनाथ महाराज हे अस्पृश्यता निवारणाच्या चळवळीतले सुरुवातीचे प्रचारक होते .ज्या कालखंडामध्ये उच्चवर्णीय समाज अस्पृश्यांची सावली ही अंगावर पडू द्यायचे नाही त्या कालखंडामध्ये एकनाथ महाराजांनी अस्पृश्यांना सन्मानाची वागणूक दिली त्यांच्या वाड्यामध्ये कीर्तन आणि प्रवचन करिता सर्व जाती-धर्मांच्या लोकांना परवानगी होती. पैठणच्या रणरणत्या उन्हात पाय पोळताना रडणाऱ्या महाराच्या मुलांला एकनाथांनी त्याच्या घरी नेऊन सोडले यावरून आपल्या लक्षात येते की एकनाथ महाराजांनी ४०० वर्षांपूर्वी आपल्या कृतीतून जातीयता पाळू नका याची शिकवण दिली.विधवांचे पुनर्वसन, गरीब आणि दलितांसाठी अन्नदान यासारखी समाजोपयोगी कार्ये केली.

- संत रामदास स्वामींनी स्वराज्यसंस्थापनेसाठी प्रेरणा दिली आणि युवा वर्गात राष्ट्रभक्तीची भावना निर्माण केली.

यावरून आपल्या लक्षात येईल की संत वांग्मय किंवा संत साहित्य म्हणजे केवळ धार्मिक साहित्य नसून जीवन उपयोगी ग्रंथ आहेत.

**नैतिकता आणि मूल्यशिक्षण:**

संत वाङ्मय हे केवळ ईश्वरभक्ती आणि समाजसुधारणेपुरते मर्यादित नाही, तर त्यातून नैतिकता आणि जीवनमूल्यांची शिकवणही मिळते. संतांनी मानवाने कोणत्या गुणांचा अंगीकार करावा आणि कोणत्या दोषांपासून दूर राहावे, याविषयी मार्गदर्शन केले आहे.

- **संत तुकारामांनी** "सत्य, प्रेम, आणि संयम" यांचे महत्त्व सांगितले.
- **संत रामदासांनी** "कष्ट, शिस्त आणि स्वावलंबन" यांवर भर दिला
- **संत ज्ञानेश्वरांनी** "आत्मज्ञान" आणि "सर्वप्राणिमात्रांप्रती दया" यांची शिकवण दिली.
- **संत चोखामेळा यांनी** "सर्व मानव समान आहेत" हा संदेश दिला.

या शिकवणींमुळे आजही संत वाङ्मय हे जीवनमूल्यांचे उत्तम मार्गदर्शक आहे.

**मानसिक शांती आणि समाधान:**

आजच्या तणावग्रस्त जीवनात मानसिक शांती मिळवण्यासाठी संत वाङ्मय अत्यंत उपयुक्त आहे. संत साहित्याच्या माध्यमातून जीवनातील अडचणी, समस्या यावर आपणाला योग्य मार्ग मिळतो.

- संत तुकाराम महाराज आपल्या अभंगाच्या माध्यमातून सांगतात की आपल्या जीवनातील दुःख हे पर्वताएवढे असते पण सुख मात्र जवा पाडे म्हणजेच जवसासारखे लहान आहे असे सांगतात यावरून आपल्या दुःखावर मात करण्याचा मार्ग सुचवितात.
- मानवी जीवनातील समस्या व अडचणींवर संत एकनाथांची भारुडे उपाय सुचवताना दिसतात त्यांचे ‘विंचू चावला’ हे भारुड मनुष्याला काम क्रोध आणि अहंकार चढला की तो माणूस विंचु चावल्यासारखा पागल होतो, चुकीचे निर्णय घेतो आणि चुकीच्या मार्गाला लागतो.
- समर्थ रामदासांनी मनाच्या श्लोकाच्या माध्यमातून मानसिक शांती आणि समाधानाचा मार्ग दाखवला आहे.

यावरून आपल्या लक्षात येईल की, संत साहित्य हे आजच्या बदलत्या धावपळीच्या जीवनशैलीमध्ये ताणतणाव दूर करण्याचा, मनाला शांती मिळवण्याचा एकच चांगला मार्ग आहे.

**भाषेचा विकास आणि लोकसंस्कृतीचा विस्तार:**

संत वाङ्मयाने लोकभाषेला आणि लोकसंस्कृतीला एक वेगळी ओळख दिली.

- संत ज्ञानेश्वरांनी संस्कृत ग्रंथांचे मराठीत भाषांतर करून ज्ञानसंपदा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवली.
- संत तुकारामांनी अभंग, ओवी आणि गाथा यांसारख्या साहित्य प्रकारांचा विकास केला.
- संत एकनाथांनी भारुड आणि लोकगीते रचून जनसामान्यांपर्यंत तत्त्वज्ञान पोहोचवले.
- संत जनाबाईंनी अनेक अभंगांची रचना केली.

या संतांच्या योगदानामुळे मराठी भाषेचा विकास झाला आणि लोकसंस्कृती अधिक समृद्ध झाली.

**निष्कर्ष:**

१. संत वाङ्मय केवळ एक धार्मिक किंवा भक्तिपरंपरा नव्हे, तर ते एक संपूर्ण जीवनदर्शन आहे.

२. संत साहित्यात समाज सुधारणा, नैतिक मूल्ये, मानसिक शांती, भाषेचा विकास आणि लोकसंस्कृतीचे संवर्धन यांचा समावेश होतो.

३. हजारो वर्ष उलटूनही आजही संतांचे विचार तितकेच महत्त्वाचे आहेत, जितके ते त्यांच्या काळात होते.

४. संत वाङ्मय हे प्रत्येक पिढीसाठी उपयुक्त आहे, कारण ते मनुष्याला सत्य, अहिंसा, प्रेम, भक्ती आणि समर्पण यांचा मार्ग दाखवते.

५.संत वाङ्मयाचा अभ्यास हा जीवनाला समृद्ध करणारा ठरतो.

**संदर्भ ग्रंथ:**


१."संत तुकाराम: चरित्र व साहित्य" – रा. चिं. ढेरे.

२."तुकारामाची ओवी आणि तत्त्वज्ञान" – पु. ग. सहस्रबुद्धे

३."तुकाराम दर्शन" – वासुदेवशास्त्री अभ्यंकर

४."अमृतानुभव आणि त्याचे तत्त्वज्ञान" – भा. रा. तांबे

५."नामदेव आणि त्यांचा कीर्तनपरंपरेतील वाटा" – ना. वा. तिखे

६."संत एकनाथ आणि मराठी साहित्य" – ना. सी. केळकर

७."संत चोखामेळा आणि दलित संत परंपरा" – डॉ. आ. ह. साळुंखे

८."संत रामदास आणि त्यांचे समाजकार्य" – वि. स. बापट.

९."मराठी दलित संतांची वचने" – प्रा. वि. म. शिंदे

१०."भक्ती चळवळीचा ऐतिहासिक अभ्यास" – स. ग. तुळपुळे

११."संत साहित्य आणि समाज परिवर्तन" – ना. सी. केळकर